नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/११/२०२५ (मंगळवार )**

## अवैध रित्या अंमलीपदार्थ गांजाची विक्री साठी साठवणुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ३३.६०० किलो गांजा जप्त नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक २५/११/२०२५ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, ईसम नामे समीर राउत याने काटोल शहरातील चांडक ले आउट , वार्ड क्र. ७ मध्ये, गणेश मंदिर जवळ घरमालक नामे रमेशराव गजभिये यांचे घरी किरायाने घेतलेल्या रुममध्ये गांजा या अंमली पदार्थाची साठवणुक करुन ठेवलेली आहे.नमुद पथकाने सदर माहीती काटोल पोलीसांना देत मिळालेल्या महीतीच्या आधारे संयुक्तरित्या कारवाई करत घटनास्थळी जावुन पाहणी केली असता आरोपी नामे १) समीर विजयराव राउत, वय. २४ वर्षे, धंदा. व्यापार रा. दातेवाडी ता. नरखेड जि.नागपुर हा मिळुन आला त्याला अधिक विचारपुस केली असता सदर खोली आपण नाराळाच्या व्यापारासाठी किरायाने घेतली असल्याचे सांगितले. घटनास्थळी आरोपी २) सचिन भागवत झोड वय. २२ वर्षे धंदा— मजुरी रा.डोर्ली भांडवलकर ता.कटोल जि.नागपुर व ३) छगन प्रितम चरपे वय. २३ वर्षे धंदा— मजुरी रा. दातेवाडी ता. नरखेड जि.नागपुर हे सुध्दा मिळुन आले. नमुद खोलीची झडती घेतली असता आरोपीच्या घरात गांजा सदृश्य पदार्थ मिळुन आला. नमुद आरोपीतांकडे गांजा कोठुन

आणाल याबाबत अधिक चौकशी केली असता अशी माहीती प्राप्त झाली की, आरोपी **आरोपी क्रं १) समीर विजयराव राउत आणि २) वैभव दिलीपराव काळे, रा. डोर्ली अशांचे सांगणेवरुन आणि पैसे पुरविले वरून ३) छगन प्रितम चरपे रा.दातेवाडी ता.नरखेड, ४)सचिन भागवत झोड रा. डोर्ली ता.काटोल , ५) सुरज बाबराव सुपटकर, रा.दातेवाडी ता. नरखेड, ६) विशाल देविदास शेभेंकर, रा. मेंढला ता.नरखेड अशांनी महेंद्रा बोलेरा पिक—अप वाहन क्र एम एच ४० डीसी ००९३ ने बालंगीर , उडिसा येथुन आणल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ३३.६०० किलो ग्रॅम गांजा किंमती ६,७२,०००/—रूपये, ३ अॅड्राईड मोबाईल , महेंद्रा बोलेरो पिकअप मालवाहु वाहन क्र. एम एच ४० डी.सी ००९३ आणि इतर साहीत्य असा एकुण १७,१७,००० /— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला.**

**नमुद आरोपीच्या विरूध्द पोलीस स्टेशन काटोल येथे एन.डि.पि.एस. अँक्ट कलम ८(क),२० (ब) (ii) (क), २२,२९ अन्वये कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी अटक प्रक्रीया सुरू आहे.**




## सावनेर पोलीस स्टेशन हद्दीतील बेपत्ता अल्पवयीन बालक भावेश विनोद खोडणकर मिळुन आल्याबाबत..

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक २१/११/२०२५ रोजी सकाळी १०/४५ वा. सुमारास फिर्यादी नामे. सौ. बबीता विनोद खोडणकर, वय ३६ वर्ष,रा.वार्ड क्र.०६ यशवंतबाबा झोपडपटटी, सावनेर ता.सावनेर जि.नागपुर, यांचा अल्पवयीन बालक **भावेश विनोद खोडणकर,वय १३** वर्षे,रा.वार्ड क्र.०६ यशवंत बाबा झोपडपटटी,सावनेर ता.सावनेर जि.नागपुर हा शाळेतील बस मध्ये बसुन शाळेत गेला,परंतु शाळेत न जाता कुठे तरी निघुन गेलेला आहे. नमुद प्रकरणी पोलीस स्टेशन सावनेर येथे कलम १३७(२)बी.एन.एस.२०२३ गुन्हा नोंद आहे.

**सदर प्रकरणी पोलसांनी तात्काळ तपास करीत नमुद अल्पवयीन बालक भावेश विनोद खोडणकर,वय १३ वर्षे याचा शोध घेतला असुन दिनांक २५/११/२०२५ रोजी नमुद बालकाला श्री खाटुश्याम मंदीर, कडे जाणाऱ्य रस्त्यावरून राज्य. राजस्थान येथुन ताब्यात**

**घेतले असुन नमुद बालकाने सांगितले की, त्याला श्री खाटु श्याम मंदीरात जायचे असल्याने तो एकटाच निघुन गेला होता.**

## कळमेश्वर खुनाच्या प्रयत्न प्रकरणात अग्निशस्त्र पुरवणारा आरोपी अटक

**पोलीस स्टेशन कळमेश्वर**:— बाल्या हिरामण गुजर, रा. बिरसा नगर,कुही फाटा ता उमरेड याला दिनांक २३/११/२०२५ रोजी दुपारी शंकरपट गावात आरोपी नामे देवा उर्फ परमेश्वर पिसाराम एकनाथ, रा. वार्ड क्र २ सेलु, ता कळमेश्वर, जि. नागपुर तसेच त्याचे साथीदांर यांनी जुन्या वादाच्या कारणावरून त्याला अग्निशस्त्राने गोळी झाडुन जिवे मारण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम १०९, ११८(१), १८९(२), १९१(२), १९१(३),१९० भा.न्या.सं सहकलम ३,४/२५ आर्म ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर प्रकरणी पोलीसांनी दिनांक २३/११/२०२५ रोजी १)परमेश्वर उर्फे देवा पिसाराम एकनाथ, वय ३४ वर्ष २) काशिराम बापुराव एकनाथ वय ५० वर्षे,३) सावनाथ उर्फे सावन काशिनाथ एकनाथ वय २५ वर्षे ४) चंद्रशेखर उर्फे राहीन प्रेमलाल एकनाथ, वय २० वर्षे,५)प्रेमलाल बोहुरजी एकनाथ वय ५५ वर्षे, ६) तपन पिसाराम एकनाथ वय २० वर्षे ७)आकाश पिसाराम एकनाथ वय २८ वर्षे ८) मोरेश्वर पिसाराम एकनाथ वय ३० वर्षे सर्व रा. सेलु, ९) रोशन रतन एकनाथ वय ३१ वर्षे, रा. १०) दिनेश ईश्वर सनेश्वर,वय ३० वर्षे, रा. देशमुख खैरी **यांचा तात्काळ शोध घेवुन ताब्यात घेतले नमुद आरोपीतांची चौकशी केली असता आरोपी चंद्रशेखर उर्फे राहीन प्रेमलाल एकनाथ याने सदर अग्निशस्त्र (देशी माउजर) आरोपी क्रं ११) अमृतसिंग तुफानसिंग भादा, वय २२ वर्षे, रा. वार्ड क्र १५ सरदार मोहल्ला कळमेश्वर याचे कडुन विकत घेवुन आरोपी नामे देवा उर्फ परमेश्वर पिसाराम एकनाथ याला दिल्याची माहीती प्राप्त झाली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ शोध घेवुन आरोपी क्रं ११) अमृतसिंग तुफानसिंग भादा याला कळमेश्वर येथुन ताब्यात घेतले. नमुद आरोपी क्रं १ ते ११ हे सर्व आरोपी अटकेत असुन मा.न्यायालयाने दिनांक २७/११/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.**

## अल्पवयीन अपहृत मुलीचा घेतला शोध ,अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन रामटेक येथे दिनांक ०५/०९/२०२४ रोजी अप क्र ६१३/२०२६ कलम १३७(३),१४३ भा.न्या.सं अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलीचा शोध लागत नव्हता. नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी हीचा शोध घेण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने सदर गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांचे कडे वर्ग करण्यात आला. श्री मिलींद तायडे, प्रभारी अधिकारी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात पोउपनि श्री मंगेश वानखडे, मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना कांबळे, पोशि पन्नालाल बटाउवाले त्यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला.नमुद गुन्हयातील अपहृत मुलीचा गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या मदतीने शोध घेवुन दिनांक २५/११/२०२५ रोजी नागपुर येथे ताब्यात घेतले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास रामटेक पोलीस करीत आहेत.

## पोलीस ठाणे रामटेक हद्दीतील मौजा मानापुर शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक २४/११/२०२५ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, आरोपी नामे अमोल मारोती लिल्हारे, हा मौजा मानापुर शिवार येथे नाल्याच्या काठावर झाडीझुडपात हातभट्टी लावुन मोहाफुल दारू काढत आहे. अशी माहीती प्राप्त होताच पोलीसांनी नमुद ठिकाणी जावुन धाड टाकुन सुरू असलेल्या भट्टया नष्ट केल्या. **आरोपी नामे अमोल मारोती लिल्हारे, वय २८ वर्षे, रा. चिचाळा, ता रामटेक** ,याचेवर कारवाई करत घटनास्थळावरून १) २०० लीटर मोहाफुल गावठी दारू कीमंती २०,०००/—रूपये तसेच लोखंड ड्रम, जर्मनचे पातेले, पाईप, जळाउ लाकडे तसेच दारू गाळण्याचे इतर साहित्य **असा एकुण १,४५,६०० रूपयांचा** मुद्देमाल

मळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला



## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक २३/११/२०२५ रोजी रात्री ११.०० वा सुमारास विसावा बार ॲड रेस्टॉरेन्ट समोरील रोडवर फिर्यादी जखमी नामे आरिफ लतीफ शेख रा. मातापुरा कळमेश्वर याला आरोपी १) हरिष ग्वालबंसी २) राजू सोनारे ३) आशिष गिरी (४) रोशन बबन यादव ५) आशुतोष शैलेश ग्वालबंसी ६) अनिकेत अनिल उईके सर्व रा. नागपूर यांनी जुन्या वादाचे कारणावरून गैरकायद्याची मंडळी जमवून जखमी आरिफला जिवे

मारण्याचे उददेशाने लाठी, दगड व हातबुककीने गारहाण करून जखमी केले व कारमध्ये अपहरण करून मारहाण करत फ्रेन्डस् कॉलनी येथे घेवून गेले. अशा जखमीचे बयाणा वरून पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम १०९, १४०(१). १८९(२), १९०,१९१ (३) भान्यासं प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्हयात आरोपी १ अनिकेत अनिल उईके वय २८ वर्ष रा. मकरधोकडा,२ रोशन बबन यादव वय ३२ वर्ष रा. मकरधोकडा,३ आशुतोष शैलेश ग्वालबंसी वय २५ वर्ष रा. मकरधोकडा,यांना दि.२४/११/२०२५८ रोजी अटक करण्यात आली असून त्यांची मा. न्यायालयाने दिनांक २६/११/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे. अरोपी हरिष ग्वालबंसी याला दिनांक २५/११/२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. **एकुण ४ आरोपी अटक आहेत**.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे,दारू बाळगुण विक्री तसेच सेंवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २२ गुन्हे नोंद.

दिनांक २४/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे तसेच दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, सडवा तसेच इतर साहीत्य असा **एकुण १,३०,०७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन मौदा येथे ३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कन्हान येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बोरी येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे २ गुन्हे नोंद आहे.पोलीस स्टेशन नरखेड येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कोंढाळी येथे १ गुन्हा नोंद आहे.पोलीस स्टेशन सावनेर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन उमरेड येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन भिवापुर येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन पारशिवणी येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन अरोली येथे १ गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण २२ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत १७४६० मिली देशी दारू, ८४३ लीटर मोहाफुल दारू, ६५० लिटर सडवा तसेच इतर साहीत्य असा एकुण १,३०,०७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६५६ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २५/११/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ६५६ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे २९ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३१ आरोपी अशा एकुण ११४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३६ आरोपी अशा एकुण १३० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २९ आरोपी अशा एकुण ६१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २५ आरोपी अशा एकुण ११८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ३७ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ४२ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३३ आरोपी अशा एकुण १४२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

( **सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६५६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.** )

## खापा शहरातील स्ट्रीट लाईट सुरू असल्याबाबत

दिनांक २३/११/२०२५ चे एका वृत्तपत्रात रात मे अंधेरी गलियोसे त्रस्त खापावासी अशा शिर्षकाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. सदर प्रकरणाची सविस्तर माहिती अशी आहे की, दिनांक १९/११/२०२५ रोजी हनुमान घाट, खापा येथील स्ट्रिट लाईट मध्ये तांत्रिक बिघाड आल्यामुळे उपरोक्त भागातील स्ट्रिट लाईट बंद झालेली होती. दिनांक २०/११/२०२५ रोजी विदयुत विभाग प्रमुख, नगर परिषद खापा यांनी तांत्रिक बिघाड दुरूस्त करून स्ट्रीट लाईट सुरू केलेले आहेत.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**